# हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)

**(ग्रामीण कृषि मौसम सेवा, डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली आणि प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ५३/२०२०** | **दिनांक ०३/०७/२०२०** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २७/०६/२०२० ते ०३/०७/२०२०) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०४/०७/२०१९ सकाळी ८:३० पासून ०८/०७/२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २७/०६ | २८/०६ | २९/०६ | ३०/०६ | ०१/०७ | ०२/०७ | ०३/०७ | | ०४/०७ | ०५/०७ | ०६/०७ | ०७/०७ | ०८/०७ |
| ७.० | ४२.० | १८.० | १२.० | ३.० | - | - | पाऊस (मिमी) | २२० | २२३ | ५६ | ८९ | ८४ |
| ३४.२ | ३५.० | ३४.६ | ३४.० | ३३.८ | - | - | कमाल तापमान (अं.से) | ३३ | ३१ | ३२ | ३२ | ३२ |
| २४.२ | २५.० | २४.२ | २४.० | २५.० | - | - | किमान तापमान (अं.से) | २३ | २४ | २३ | २३ | २४ |
| ४ | ६ | ४ | ६ | ३ | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | ७ | ८ | ७ | ७ | ८ |
| ८६ | ८४ | ७८ | ८७ | ८३ | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ९५ | ९७ | ९५ | ९६ | ९६ |
| ७१ | ७४ | ७६ | ७३ | ७४ | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ७५ | ९० | ८९ | ९० | ९२ |
| ०.० | ३.७ | ०.० | ०.० | ०.० | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १० | १४ | १७ | ११ | १० |
| शांत | द. | शांत | शांत | शांत | - | - | वाऱ्याची दिशा | नै.द. | नै.द. | नै. | नै. | नै.द. |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक ४ ते ८ जुलै, २०२० दरम्यान ठाणे जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे.**

**इशारा: दिनांक ४ जुलै २०२० रोजी जिल्ह्यातील काही भागामध्ये जोरदार ते अति जोरदार पाऊसाची तसेच जिल्ह्यातील तुरळक (१ किंवा २) ठिकाणी मुसळधार पाऊसाची शक्यता असून दिनांक ५ ते ८ जुलै, २०२० दरम्यान तुरळक ठिकाणी जोरदार ते अति जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.**

**विस्तारित श्रेणी अंदाजानुसार (ईआरएफएस) कोकण विभागात दिनांक ०८ ते १४ जुलै दरम्यान सरासरीपेक्षा जास्त पाऊसाची शक्यता आहे.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **खरीप भात** | **पुर्नलागवड** | • जोरदार पाऊसाची शक्यता लक्षात घेता भात खाचरातील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी तसेच लावणीनंतर पहिल्या ३० दिवसांपर्यंत भात खाचरात पाण्याची पातळी २.५ ते ५ सें.मी. पर्यंत नियंत्रित करावी.<br>• भात पुर्नलागवडीची कामे सुरु करावीत. पुर्नलागवड करावयाच्या खाचरामध्ये चिखलणी करावी. हळव्या भात जातींसाठी २० ते २१ दिवसांची आणि निमगरव्या व गरव्या जातींसाठी २७ ते ३० दिवसांची तसेच १२ ते १५ सें.मी. उंचीची आणि पाच ते सहा पाने फुटलेल्या रोपांची पुर्नलागवड करावी.<br>• जोरदार ते अतिजोरदार पाऊसाची शक्यता लक्षात घेता चिखलणीच्या वेळेस देण्यात येणारी खताची मात्रा पुढे ढकलावी आणि दिनांक ६ जुलै नंतर पाऊसाची तीव्रता कमी असताना देण्यात यावी.<br>• भात पिकाची पुर्नलागवड १५ X १५ सें.मी. (हळव्या जातींसाठी) किंवा २० X १५ सें.मी. (निमगरव्या व गरव्या जातींसाठी) अंतरावर करावी. लावणी सरळ आणि उथळ २.५ ते ३.५ सें.मी. खोल करावी. उथळ लावणी केल्याने फुटवे चांगले येतात. एका चुडामध्ये दोन ते तीन रोपे लावावीत आणि संकरीत भातासाठी एका ठिकाणी एकच रोप लावावे. |
| **नागली** | **पुर्नलागवड** | • जोरदार पाऊसाची शक्यता लक्षात घेता नागली रोपवाटीकेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **नारळ/ सुपारी** | **फलधारणा** | • मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता नारळ व सुपारी बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **दुभती जनावरे** | **-** | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच शेड मध्ये हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी<br>• जनावरांचे पाऊसापासून योग्य ते संरक्षण करावे. |

**टिप: पाऊसाची तीव्रता कमी असताना कीटकनाशकाच्या आणि बुरशीनाशकाच्या फवारण्या कराव्यात तसेच पाऊसात द्रावण पानांवर चिकटून राहण्यासाठी फवारणीच्या द्रावणात स्टिकर मिसळून फवारणी करावी.**

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**